BUSINESS & YOUTH STARTING TOGETHER

BHARATIYA YUVA SHAKTI TRUST

# भारतीय युवा शक्ती ट्रस्ट आवृत्ती ९ डिसेंबर २०१७ वार्तापत्र

भारतीय युवा शक्ती ट्रस्ट , वार्तापत्र डिसेंबर २०१७. आपल्या सर्वांचे भारतीय युवा शक्ती ट्रस्टच्या वार्तापत्रात हार्दिक स्वागत आहे. सदर वार्तापत्राचा मुख्य उद्देश आपणा सर्वांना (मेंटॉर, उद्योजकांना) भारतीय युवा शक्ती ट्रस्टच्या डिसेंबर महिन्यातील विविध महत्वपूर्ण कार्यक्रमांची इत्यंभूत माहिती मिळावी असा आहे .

भारतीय युवा शक्ती ट्रस्ट, पुणेला संस्थेच्या बातमीपत्राचा नववा अंक प्रकाशित करताना अतिशय आनंद होत आहे .
सध्या संस्थेत सुरु असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांची तपशीलवार माहिती आपणास याद्वारे उपलब्ध होईल यामुळे आपणा सर्वांचे भारतीय युवा शक्ती ट्रस्ट सोबतचे नाते अधिक वृद्धिंगत होईल असा विश्वास वाटतो

## Inside This Issue


| | |
|---|---|
| 1 | परिचय |
| 2 | स्नेह मेळावा |
| 3 | स्ट्रॅटेजिक कमिटी मिटिंग |
| 4 | एम. ए .पी मिटिंग |
| 5 | बँक ऑफ महाराष्ट्र सोबतची बैठक |





मा. प्रदीप भलवणकर, वरिष्ठ मेंटॉर ,स्नेह मेळाव्यात उपस्थित समुदायासमोर मनोगत व्यक्त करताना



सौ. मनस्वी सिंग ,उप व्यवस्थापक ,SBI ,यांना उद्योजकता या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मानपत्र देऊन सन्मानित केले




## स्नेह मेळावा

आम्ही दिनांक २८ डिसेंबर रोजी स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते . मेळाव्यात १०० उद्योजकांनी उपस्थिती लावली . खालील मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले .

1. मा. योगीराज देवकर , उप संचालक ,महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र
2. **मा. भिकचंद बोरा** ,AGM ,SBI.
3. मा. सिद्धार्थ साळुंके यांनी आपला उद्योजकीय प्रवास उपस्थितांसमोर उलगडून दाखवला .




## स्ट्रॅटेजिक कमिटी मिटिंग

अध्यक्ष , स्ट्रॅटेजिक कमिटी यांनी उपसतिस्थ सदस्यांना संस्थेच्या नोव्हेंबर महिन्यापर्यंतच्या कामगिरीची माहिती दिली . शिवाय दरम्यानच्या काळात संस्थेने हाती घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली .

1. आंतरराष्टीय सल्लागार परिषद
2. स्टेट बँक आणि भारतीय युवा शक्ती ट्रस्ट यामधील भागीदारी करार .
3. बी. वाय. एस. टी. सिल्वर जुबली हॉल ऑफ फ्रेम पुरस्कार २०१७



## बँक ऑफ महाराष्ट्र सोबतची बैठक

आम्ही बँक ऑफ महाराष्ट्राच्या सर्व चीफ -मॅनेजर सोबत बैठक आयोजित केली होती त्यात खालील मुद्यावर एकमत झाले .

- संस्थेच्या कामासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची बँकेतर्फे नियुक्ती करणे .
- उपस्थित सर्व मॅनेजरांनी संस्थेला पूर्ण सहकार्य करण्याचे मान्य केले



## एम. ए .पी मिटिंग

एम. ए. पी मिटिंग मध्ये असा सर्वानुमते ठराव झाला कि आठवड्याच्या दर गुरुवारी मेंटॉर स्वतः उद्योजकाचे समुपदेशन करतील . शिवाय मेंटॉर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन तातडीने करण्यात यावे अशी सूचना उपस्थित सदस्यांनी केली

पुणे कार्याल

भारतीय युवा शक्ती ट्रस्ट

द्वारा सी .आय.आय.,१० वा मजला ,गोदरेज पुणे कार्यालय . भारतीय युवा शक्ती ट्रस्ट . द्वारा सी .आय.आय.,१० वा मजला ,गोदरेज इटर्निया सी ,विंग ,३ जुना पुणे मुंबई हायवे ,वाकडेवाडी ,शिवाजीनगर ,पुणे - ४११००५. दूरध्वनी क्रमांक -०२०-६६०७५८१६. ई -मेल -byst.pune@cii.in

**ग्रामीण कार्यालय**

**भारतीय युवा शक्ती ट्रस्ट**

दुसरा मजला ,बँक ऑफ महाराष्ट्र , हडपसर उद्योगिक वसाहत (किर्लोस्कर कंपनीसमोर) हडपसर ,पुणे -४११०१३. दूरध्वनी क्रमांक -०२०-२६८२३८३९. ई -मेल -: byst.rm@cii.in